**प्रेस नोट** **दि.०४/०७/२०१९**

**कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर**

**हरवलेल्या मुलाच्या आईचा शोध घेवून ताब्यात दिले**

दि.०४/०७/२०१९ रोजी सकाळी ०७/३० वा. चे दरम्यान प्रतिभा पवार कोंढवा बु।। येथे एक लहान मुलगा रडत असलेला बारावीमध्ये शिकत असलेल्या विदयार्थी नामे आशिष सनके यांस आढळुन आला त्यांने सदर मुलांस आणुन खडीमशिन चौकी येथे जमा केले. सदर हरवलेला मुलगा अधिक रडत असल्याने व भेदरलेल्या अवसथेत असल्याने तो आपले नाव गाव पत्ता काही सांगु शकत नव्हता सबब सदर मुलाचा ठाव ठिकाणा शोध घेणेकामी पोह/२८९० सोनावणे, पोना/२१३१ धोत्रे खडीमशिन मार्शल,पोशि/ ७७०६ राठोड,पोशि/८७७३ कांबळे यानी मेहनत घेवुन सदर मुलाच्या आईचा शोध घेतला सदर मुलाची आई महिला नामे शैला दशरथ गायकवाड सध्या राहणार गल्ली न.६ लक्ष्मी नगर या पत्त्यावर मिळुन आली तिचेकडे अधिक चौकशी केली असता तिने सांगितले की तिचे मुळ गांव मु.पो.बुर्डी ता.निलंगा जिल्हा लातुर हे असुन ती पाहुणी म्हणुन नातेवाईकांकडे राहवयास आली असुन त्यांचा मुलगा खेळता-खेळता कोणासही काही न सांगता घरामधुन निघुन गेला होता सदर मुलगा ,वय ३वर्ष रा.गल्ली क्र.६ लक्ष्मा नगर कोंढवा बु।। पुणे-४८ कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर येथील वर नमुद पोलीस कर्मचारी यांचे अथक प्रयत्नाने मिळुन आलेला आहे व त्याला त्याचे आई नामे शैला दशरथ गायकवाड यांचे ताब्यात दिल्याने सदर महिलेने कोंढवा पोलीस ठाण्याचे सर्व कर्मचारी यांचे आभार मानले

